# गुकेश पुन्हा संयुक्त आघाडीवर

## प्रज्ञानंदने नेपोम्नियाशीला बरोबरीत रोखले; कारुआनाकडून विदितचा पराभव

**वृत्तसंस्था, टोरंटो**



**१२ व्या फेरीचे निकाल**

- **खुला विभाग :** निजात अबासोव (एकूण ३ गुण) पराभूत वि. डी. गुकेश (७.५), फॅबियानो कारुआना (७) विजयी वि. विदित गुजराथी (५), इयान नेपोम्नियाशी (७.५) बरोबरी वि. आर. प्रज्ञानंद (६), हिकारू नाकामुरा (७.५) विजयी वि. अलिरेझा फिरुझा (४.५).
- **महिला विभाग :** अलेक्झांड्रा गोर्याचकिना (एकूण ६ गुण) बरोबरी वि. कोनेरू हम्पी (६), ॲना मुझिचुक (४.५) पराभूत वि. आर. वैशाली (५.५), नुरग्युल सलिमोवा (४.५) बरोबरी वि. टॅन झोंगी (८), कॅटेरिना लायनो (६) बरोबरी वि. ले टिंगजी (७.५).

**भारताचा युवा** ग्रँडमास्टर डी. गुकेशने अझरबैजानच्या निजात अबासोववर विजय साकारताना 'कॅन्डिडेट्स' बुद्धिबळ स्पर्धेच्या १२व्या फेरीअंती गुणतालिकेत पुन्हा संयुक्त आघाडी मिळवली. ११व्या फेरीनंतर एकट्याने आघाडीवर असणाऱ्या रशियाच्या इयान नेपोम्नियाशीला भारताच्या आर. प्रज्ञानंदने १२व्या फेरीत बरोबरीत रोखले. नाशिककर विदित गुजराथीला अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाकडून पराभव पत्करावा लागला. या निकालांनंतर प्रज्ञानंद आणि विदित हे जेतेपदाच्या शर्यतीतून जवळपास बाहेर झाले आहेत.

### कॅन्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धा

या स्पर्धेच्या आता केवळ दोन फेऱ्या शिल्लक असून खुल्या विभागात जेतेपदासाठी चुरस निर्माण झाली आहे. १२व्या फेरीत अमेरिकेच्या हिकारू नाकामुराने फ्रान्सच्या अलिरेझा फिरुझाला पराभूत केले. नाकामुराचा हा सलग तिसरा विजय ठरला. त्यामुळे आता अग्रस्थानासाठी गुकेश, नेपोम्नियाशी आणि नाकामुरा यांची बरोबरी झाली आहे. या तिघांच्याही खात्यावर समान ७.५ गुण आहेत. कारुआना केवळ अर्ध्या गुणाने मागे आहे. त्यामुळे त्याच्याही जेतेपदाच्या आशा कायम आहेत. प्रज्ञानंद सहा गुणांसह पाचव्या, गुकेश पाच गुणांसह सहाव्या, फिरुझा ४.५ गुणांसह सातव्या, तर अबासोव तीन गुणांसह आठव्या स्थानावर आहे. १३व्या फेरीपूर्वी आता विश्रांतीचा दिवस आहे.

महिला विभागात, भारताच्या आर. वैशालीने युक्रेनच्या ॲना मुझिचुकला पराभवाचा धक्का दिला. वैशालीचा हा सलग तिसरा विजय होता. १२व्या फेरीतील अन्य तीनही लढती बरोबरीत सुटल्या. चीनच्या टॅन झोंगीला गुणतालिकेत तळाला असलेल्या बल्गेरियाच्या नुरग्युल सलिमोवाला नमवण्यात अपयश आले. मात्र, तिने गुणतालिकेतील अग्रस्थान कायम राखले असून तिचे आठ गुण आहेत. दुसऱ्या स्थानावर असलेली ले टिंगजी झोंगीपेक्षा केवळ अर्ध्या गुणाने मागे आहे. तिला १२व्या फेरीत कॅटेरिना लायनोविरुद्ध बरोबरीवर समाधान मानावे लागले. अन्य एका लढतीत भारताच्या कोनेरू हम्पीने रशियाच्या अलेक्झांड्रा गोर्याचकिनाविरुद्ध बरोबरी नोंदवली.

खुल्या विभागात जेतेपदाची शर्यत आता अत्यंत चुरशीची झाली. १७ वर्षीय गुकेश 'कॅन्डिडेट्स'मध्ये खेळणारा आजवरचा दुसरा सर्वांत युवा बुद्धिबळपटू आहे. मात्र, इतक्या कमी वयातही त्याने या स्पर्धेत प्रगल्भतेने खेळ केला आहे. ११व्या फेरीनंतर गुकेशची दुसऱ्या स्थानी घसरण झाली होती. त्यामुळे १२व्या फेरीत विजय मिळवणे त्याच्यासाठी गरजेचे झाले होते. त्यातच त्याला या फेरीत अबासोवविरुद्ध काळ्या मोहऱ्यांनिशी खेळावे लागणार होते. मात्र, याचे दडपण घेण्याऐवजी त्याने हे आव्हान स्वीकारले आणि अबासोववर विजय मिळवत पुन्हा संयुक्त आघाडी प्राप्त केली.

> 'कॅन्डिडेट्स' स्पर्धांच्या इतिहासात कधी नव्हे इतक्या चुरशीच्या लढती या वर्षी पाहायला मिळत आहेत. गेल्या दोन 'कॅन्डिडेट्स' स्पर्धा अगदी सहज जिंकणाऱ्या इयान नेपोम्नियाशीला यंदा अन्य खेळाडूंकडून आव्हान मिळते आहे. स्पर्धेतील सर्वांत युवा खेळाडू गुकेश आणि सर्वांत अनुभवी खेळाडू हिकारू नाकामुरा हे दोघेही १२व्या फेरीत विजयी झाले. आता केवळ दोन फेऱ्या शिल्लक असताना नेपोम्नियाशी, गुकेश आणि नाकामुरा हे तिघे संयुक्तरीत्या आघाडीवर आहे. विशेष म्हणजे नाकामुराला उरलेल्या दोन फेऱ्यांत नेपोम्नियाशी आणि गुकेश यांच्याशी खेळायचे आहे. अबासोव अखेरच्या क्रमांकावर असला, तरी तो आतापर्यंत पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना हरलेला नव्हता. त्यामुळे गुकेशने जो खेळ केला, तो एखाद्या जगज्जेत्याच्या दर्जाचा होता. आता विश्रांतीच्या दिवसानंतर नेपोम्नियाशी-नाकामुरा आणि गुकेश-फिरुझा या १३व्या फेरीतील लढतींवर सगळ्यांचे लक्ष असेल.
>
> **– रघुनंदन गोखले,** बुद्धिबळ प्रशिक्षक.

अबासोवविरुद्ध गुकेशने निम्झो इंडियन बचावपद्धतीचा अवलंब केला. याचे अबासोवकडे उत्तर नव्हते. डावाच्या मध्यात अबासोवला डोके वर काढण्याची संधी होती. मात्र, गुकेशने अचूक चाली रचताना आपले वर्चस्व कायम राहील याची काळजी घेतली. फारशी प्यादी शिल्लक नसल्याने अबासोव दडपणाखाली आला. अखेर ५७व्या चालीअंती त्याने हार मान्य केली.

# लखनऊची चेन्नईवर मात

**लखनऊ :** कर्णधार केएल राहुल (५३ चेंडूंत ८२ धावा) आणि क्विंटन डिकॉक (४३ चेंडूंत ५४) यांच्या चांगल्या फलंदाजीच्या जोरावर लखनऊ सुपर जायंट्सने शुक्रवारी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटच्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जवर आठ गडी राखून विजय मिळवला.

लखनऊ येथे झालेल्या या सामन्यात यजमानांनी नाणेफेक जिंकून चेन्नईला फलंदाजीचे आमंत्रण दिले. चेन्नईने २० षटकांत ६ बाद १७६ अशी धावसंख्या उभारली. रवींद्र जडेजा (४० चेंडूंत नाबाद ५७), अजिंक्य रहाणे (२४ चेंडूंत ३६), मोईन अली (२० चेंडूंत ३०) आणि महेंद्रसिंह धोनी (९ चेंडूंत नाबाद २८) यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. लखनऊसाठी कृणाल पंड्याने (२/१६) प्रभावी मारा केला.

लखनऊने १७७ धावांचे लक्ष्य १९ षटकांत दोन गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केले. राहुल आणि डिकॉक यांनी १५ षटकांत १३४ धावांची सलामी देताना लखनऊचा विजय सुकर केला. निकोलस पूरनने (१२ चेंडूंत नाबाद २३) अखेरीस फटकेबाजी केली. लखनऊचा सात सामन्यांतील हा चौथा विजय ठरला.

# आशिया ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेत दीपक, सुजितला प्रवेश नाकारला!

## दुबईतील पावसामुळे बिश्केकमध्ये पोहोचण्यास उशीर



दीपक पुनिया



सुजित कलकल

**बिश्केक (किर्गिझस्तान) :** टोक्यो ऑलिम्पिक स्पर्धेत पदकापासून थोडक्यात वंचित राहिलेला दीपक पुनिया, तसेच सुजित कलकल या भारतीय कुस्तीगिरांना पॅरिस ऑलिम्पिक प्रवेशाच्या पहिल्या संधीला मुकावे लागले. आशिया ऑलिम्पिक पात्रता कुस्ती स्पर्धेला किर्गिझस्तानातील बिश्केकमध्ये शुक्रवारपासून सुरुवात झाली. यासाठी शुक्रवारी सर्व मल्लांची वजने घेण्यात आली. मात्र, वजनासाठी दोघेही भारतीय मल्ल वेळेत पोहचू न शकल्यामुळे संयोजकांनी त्यांची प्रवेशिका अपात्र ठरवली.

रशियातील सराव संपवून दुबईमार्गे बिश्केकला पोहोचण्याच्या वाटेवर असणाऱ्या या दोघांनाही वादळी पावसामुळे दुबईत अडकून राहावे लागले. दीपक (८६ किलो) आणि सुजित (६५ किलो) हे दोघेही मंगळवारपासून दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरच अडकले होते. पावसामुळे विमानसेवा पूर्ववत होण्यास उशीर झाला. त्यामुळे दोघे शुक्रवारी सकाळी ८ वाजता बिश्केक येथे स्पर्धेच्या ठिकाणी पोहोचले. मात्र, तोवर सहभागी मल्लांच्या वजनाची प्रक्रिया सुरू झाल्यामुळे संयोजकांनी त्यांना प्रवेश नाकारला. स्पर्धेत आता दीपकच्या जागी ५७ किलो वजनी गटातून अमन सेहरावत भारताचे प्रतिनिधित्व करेल. विनेश फोगटची लढत शनिवारी होईल.

उशीर होण्याची कारणे दीपक आणि सुजित यांनी संयोजकांना सांगितली. मात्र, संयोजकांनी त्यांना सूट देण्यास नकार दिला. दीपक आणि सुजित यांना या स्पर्धेत खेळता आले नसले, तरी आता त्यांना पुढील महिन्यात होणाऱ्या जागतिक ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेतून अखेरची संधी मिळणार आहे.

दीपक आणि सुजित त्यांच्या वैयक्तिक प्रशिक्षकांसह मंगळवारपासून दुबईत अडकले होते. शुष्क वाळवंट असलेल्या संयुक्त अरब अमिरातीत विक्रमी पाऊस झाला. दुबई विमानतळाच्या परिसरात पूरसदृश परिस्थिती झाली होती. त्यामुळे हे दोघे मंगळवारपासून तेथेच अडकले होते. त्यांना विमानतळावर फरशीवर झोपावे लागले. हे दोघे वैयक्तिक प्रवास करत होते. त्यांनी रशियातील दागेस्तान येथे २ ते १५ एप्रिल या कालावधीत सराव केला.

### पहिल्या दिवशी निराशा

आशिया ऑलिम्पिक पात्रता कुस्ती स्पर्धेत पहिल्या दिवशी फ्री-स्टाईल प्रकारात भारताच्या पदरी निराशा पडली. ५७ किलो वजनी गटात भारताचा अमन उपांत्य फेरीत उझबेकिस्तानच्या अब्दुल्लाएवकडून १०-० असा पराभूत झाला. दीपकचा ९७ किलो वजनी गटात जपानच्या योशिदाकडून मानांकन फेरीतच पराभव झाला. १२५ किलो वजनी गटात सुमितनेही अशीच निराशा केली. ६५ किलो वजनी गटात किर्गिझस्तानच्या ओरोझोबेक तोक्तोमाम्बेतोवकडून जयदीपला पराभव पत्करावा लागला. ही लढत २-२ अशी बरोबरीत होती. मात्र, अखेरचा गुण मिळविणाऱ्यास विजेता घोषित करण्यात येते. या नियमानुसार ओरोझोबेक विजयी ठरला.


**बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda**

**बँक ऑफ बडोदा**
अंचल दबावग्रस्त आस्ति वसुली शाखा, पुणे
पहिला मजला, अतुर चेंबर्स,२, मोलेदिना रोड, पुणे-कॅम्प, महाराष्ट्र ४११००१

**स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**
अपेंडिक्स -IV-A रूल ८(६) पहा

**विक्रीसाठी ई-ऑक्शन नोटीस**

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२, त्यासह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स्, २००२ मधील नियम ८(६) अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-ऑक्शन विक्री सूचना**

यानुसार सर्वसाधारण जनतेस आणि विशेषतः कर्जदारास (दारांस), गहाणदारास (दारांस), जामीनदारास (दारांस) सूचना देण्यात येते की, पुढे नमूद करण्यात आलेल्या स्थावर मालमत्ता ज्या सुरक्षित धनकोंकडे गहाण / तारण ठेवण्यात आल्या आहेत आणि **बँक ऑफ बडोदा**, सुरक्षित धनको यांचे अधिकृत अधिकारी सदर मालमत्तांचा ताबा घेतला असून सदर मालमत्तांची 'जे आहे जेथे आहे तेथे', 'जे आहे जसे आहे' आणि 'तेथे जे काही आहे' या तत्त्वावर पुढे नमूद केलेल्या खात्यावर / खात्यांवर येणे असलेली कर्जाजी रक्कम वसूल करण्यासाठी विक्री करण्यात येणार आहे, कर्जदाराची (दारांची) / गहाणदाराची (दारांची) / जामीनदाराची (दारांची) / सुरक्षित मालमत्तेची (मालमत्तांची) / येणे बाकी / राखीव किंमत / ई-ऑक्शनची तारीख आणि वेळ, बयाणा रक्कम, बोली वाढीची रक्कम ही माहिती पुढे देण्यात आली आहे.

| अ. क्र. | कर्जदार / गहाणदार / जामीनदारांचे नाव | स्थावर मालमत्तेचा आणि त्यावर जर काही बोजा असेल तर, त्याचा तपशील व ताब्याचा प्रकार | राखीव किंमत, बयाणा रक्कम, बोली वाढविण्याची रक्कम (रक्कम रुपयांत) |
|---|---|---|---|
| १. | मेसर्स दयाल कॉट्सपिन लिमिटेड, संचालक आणि/किंवा जामीनदार- श्री. पवनकुमार जगदीशप्रसाद बच्चुका, श्री. विनयकांत विश्वनाथ बच्चुका, श्री. मनीषकुमार वसंतकुमार बच्चुका, श्री. गोविंद वशंभरदयाल शर्मा, श्री. भरतकुमार जगदीशप्रसाद बच्चुका, श्री. विश्वनाथ प्रभुदयाल बच्चुका, श्री. वसंत प्रभुदयाल बच्चुका, श्री जगदीश प्रभुदयाल बच्चुका आणि मे. दयाल कॉटन मिल्स लि. | सर्व भाग आणि पार्सल गट क्रमांक ४४३, राळेगाव रोड, कळंब, यवतमाळ येथे असलेल्या एनए औद्योगिक जमीन आणि इमारतीचा सर्व तुकडा आणि यंत्रसामग्री मेसर्स दयाल कॉटन मिल्स लिमिटेडच्या नावाने एकत्रितपणे क्षेत्रफळ ३ हे. ०१ आर. | राखीव : रू. ८,५०,८४,०००/- बयाणा : रू. ८५,०८,४००/- बोली वाढ : रू. १,००,०००/- |
| २. | | सर्व भाग आणि पार्सल गट क्रमांक २०७, गाव बाभूळगाव, तालुका आणि जिल्हा अकोला येथे स्थित एनए औद्योगिक जमीन आणि इमारतीचा सर्व तुकडा आणि यंत्रसामग्री, मेसर्स दयाल कॉटन मिल्स लिमिटेडच्या नावाने एकत्रितपणे क्षेत्रफळ १ हेक्ट ६२ आर. | राखीव : रू. ४,३१,९३,०००/- बयाणा : रू. ४३,१९,३००/- बोली वाढ : रू. १,००,०००/- |

**१३(२) नुसार नमूद केल्याप्रमाणे येणे बाकी रक्कम दिनांक १०/०५/२०२३ : रु. २५,९७,०७,७५६ + त्यावरील व्याज**

- **ऑक्शनची तारीख आणि वेळ : दि. ०६.०६.२०२४, दु. २.०० ते सायं. ०६.०० दरम्यान.**
- **मालमत्ता पाहणीची तारीख व वेळ : दि. ०४.०६.२०२४, स. १०.०० ते दु. ०४.००.**

सविस्तर अटी आणि शर्तीसाठी येथे स्कॅन करा.

**नोट** : विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांवर कोणत्याही प्रकारचे आकार, धाणाधिकार, बोजा मालमत्ता कराची थकबाकी, वीजबिल थकबाकी इ. किंवा कोणत्याही सरकारी किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा इतर कोणाचीही कुठल्याही प्रकारात थकबाकी असल्यास त्यासाठी अधिकृत अधिकारी जबाबदार असणार नाहीत. विक्रीच्या सविस्तर अटी आणि शर्तीसाठी कृपया **https://www.bankofbaroda.in/e-auction.htm** आणि **https://ibapi.in** ही लिंक पहावी. तसेच संभाव्य प्रस्तावक खाली सही करणार **श्री. संदीप माळी (सहाय्यक महाप्रबंधक व अधिकृत अधिकारी)** यांच्याशी फोन नं. ०२०-२४२६०१८१ किंवा मोबाईल नं. **+९१-७७१५८२०१३५** वर संपर्क साधू शकतात.

**दिनांक: २०.०४.२०२४**
**ठिकाण : पुणे**

अधिकृत अधिकारी,
बँक ऑफ बडोदा, झेडओएसएआरबी, पुणे


# दिल्लीचा आज हैदराबादशी सामना

**नवी दिल्ली :** ऋषभ पंत घरच्या मैदानावरील पुनरागमनासाठी सज्ज झाला असून इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये आज, शनिवारी दिल्ली कॅपिटल्ससमोर सनरायजर्स हैदराबादचे आव्हान असेल.

दिल्लीच्या संघाने यंदाच्या हंगामात आतापर्यंत सात सामने खेळले असले, तरी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर हा त्यांचा पहिलाच सामना असणार आहे. यापूर्वी त्यांनी घरच्या मैदानावरील दोन सामने विशाखापट्टणम येथे खेळले होते. त्यामुळे पंतला आता बऱ्याच काळानंतर दिल्लीत सामना खेळण्याची संधी मिळणार आहे.

डिसेंबर २०२२मध्ये कार अपघातात गंभीर जखमी झालेल्या पंतने यंदा 'आयपीएल'मधून स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये पुनरागमन केले. त्याने आतापर्यंतच्या स्पर्धेत चमकदार कामगिरी केली आहे.

- **वेळ :** सायं. ७.३० वा.
- **थेट प्रक्षेपण :** स्टार स्पोर्ट्स १, १ हिंदी, जिओ सिनेमा ॲप.

# मुंबईचा कर्णधार हार्दिकला दंड

**मुल्लांपूर :** पंजाब किंग्जविरुद्धच्या 'आयपीएल' सामन्यात षटकांची गती धिमी राखल्यामुळे मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पंड्याला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. गुरुवारी झालेल्या या सामन्यात मुंबईने २० षटके टाकण्यासाठी असलेल्या निर्धारित वेळेत दोन षटके कमी टाकली.

या सामन्यात मुंबईने दिलेल्या १९३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना पंजाबची ४ बाद १४ अशी स्थिती होती. मात्र, आशुतोष शर्मा (६१) आणि शशांक सिंह (४१) यांनी सामन्यात रंगत निर्माण केली. परंतु अखेरीस पंजाबचा डाव १८३ धावांत संपुष्टात आल्याने मुंबईने विजय मिळवला.

मुंबईच्या संघाने निर्धारित वेळेत दोन षटके कमी टाकली होती. त्यामुळे पंजाबच्या डावातील अखेरच्या दोन षटकांत मुंबईला ३० यार्ड वर्तुळाच्या बाहेर केवळ चार क्षेत्ररक्षक ठेवण्याची परवानगी होती. तसेच सामन्यानंतर हार्दिकवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

# 'आयटी' कंपन्यांच्या मनुष्यबळात घट

## देशातील आघाडीच्या टीसीएस, इन्फोसिस, विप्रोचा समावेश

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

**मनुष्यबळातील घट २०२३-२४**

| कंपनी | एकूण घट | टक्क्यांमध्ये |
|---|---|---|
| विप्रो | २४ हजार ५१६ | ९.५ |
| इन्फोसिस | २५ हजार ९९४ | ७.५ |
| टीसीएस | १३ हजार २४९ | २.१ |



**माहिती तंत्रज्ञान** (आयटी) क्षेत्रातील देशातील आघाडीच्या कंपन्यांच्या मनुष्यबळात मार्चअखेर सरलेल्या आर्थिक वर्षात घट नोंदविण्यात आली आहे. यात टीसीएस, इन्फोसिस आणि विप्रो या प्रमुख कंपन्यांचा समावेश आहे.

विप्रो कंपनीच्या मनुष्यबळात मागील दशकभरात तिसऱ्यांदा वार्षिक घट नोंदविण्यात आली आहे. कंपनीचे मनुष्यबळ आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या सुरुवातीला २ लाख ५८ हजार ५७० होते. आर्थिक वर्षाच्या अखेरीस ते २ लाख ३४ हजार ५४ वर घसरले. वर्षभरात कंपनीच्या मनुष्यबळात एकूण २४ हजार ५१६ म्हणजेच ९.५ टक्के घट झाली. सलग सहाव्यात तिमाहीत विप्रोच्या मनुष्यबळात घट झाली आहे.

टीसीएसचे मनुष्यबळ गेल्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला ६ लाख १४ हजार ७९५ होते. आर्थिक वर्ष संपले त्या वेळी हे मनुष्यबळ ६ लाख १ हजार ५४६ वर आले आहे. मनुष्यबळात एकूण १३ हजार २४९ म्हणजेच २.१ टक्के घट नोंदविण्यात आली.

टीसीएसच्या मनुष्यबळात १९ वर्षांमध्ये पहिल्यांदाच घट झाली आहे.

इन्फोसिसचे मनुष्यबळ गेल्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला ३ लाख ४३ हजार २३४ होते. आर्थिक वर्षाच्या अखेरीस ते ३ लाख १७ हजार २४० वर आले. वर्षभरात कंपनीच्या मनुष्यबळात एकूण २५ हजार ९९४ म्हणजेच ७.५ टक्के घट नोंदविण्यात आली आहे. कंपनीच्या मनुष्यबळात दोन दशकांत प्रथमच घट झाली आहे.

# 'सेन्सेक्स'ची सहा शतकी दौड

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**



**मुंबई :** गेले काही दिवस सैल झालेली पकड पुन्हा मजबूत करीत तेजीवाल्यांचे भांडवली बाजारात शुक्रवारी उत्साही पुनरागमन झाल्याचे दाखवून दिले. बँकिंग आणि वाहन कंपन्यांच्या समभागांमध्ये गुंतवणूकदारांनी खरेदीचा सपाटा लावल्यामुळे चार सत्रांतील घसरणीला लगाम बसला. इस्रायल-इराणमधील भूराजकीय तणाव वाढण्याच्या भीतीने भांडवली बाजाराने नकारात्मक पातळीवरून व्यवहाराला सुरुवात केली होती. मात्र दुपारच्या सत्रात नीचांकी पातळीवरून सावरत बाजार सकारात्मक पातळीवर स्थिरावला.

सप्ताहअखेर सेन्सेक्स ५९९.३४ अंशांनी वधारून ७३,०८८.३३ पातळीवर स्थिरावला. सकाळच्या सत्रात व्यवहाराला सुरुवात होताच सेन्सेक्स ६७२.५३ अंशांनी घसरून ७१,८१६.४६ या सत्रातील नीचांकी पातळीवर पोहोचला. मात्र गेल्या चार सत्रांत झालेल्या पडझडीमुळे कमी किमतीला उपलब्ध असलेल्या बँकिंग क्षेत्रातील समभाग खरेदीसाठी गुंतवणूकदारांनी गर्दी केली. दुसरीकडे निफ्टी देखील १५१.५१ अंशांनी वधारून २२,१४७ पातळीवर बंद झाला.

जागतिक पातळीवर नकारात्मकता असूनही, इस्रायलने इराणविरुद्ध केलेल्या कारवाईनंतर दोन्ही देशांमधील तणाव वाढण्याच्या मर्यादित शक्यतेने देशांतर्गत भांडवली बाजारात लार्ज-कॅप समभागांमधील तेजीने बाजार सावरला. मात्र, खनिज तेलाच्या वाढत्या किमतीने चिंता कायम आहे, ज्यामुळे महागाईचा धोका निर्माण झाला, असे मत जिओजित फायनान्शियल सर्व्हिसेसचे संशोधन प्रमुख विनोद नायर यांनी व्यक्त केले.


**Army Institute of Technology**
**Dighi Hills, Pune - 411 015**

**Tender Enquiry**

| Sr. No. | Description | EMD (DD) | Last date of submission |
|---|---|---|---|
| 1. | Procurement of Uniform Cloth for First Year Students : 2024-25 | Rs. 40,000/- | 13 May 2024 |
| 2. | Procurement of Mettresses for First Year Students : 2024-25 | Rs. 25,000/- | 06 May 2024 |

**Tender Fee : Rs. 1,000/- (DD)**
Refer **www.aitpune.com** for details
email : **project@aitpune.edu.in**, Tele : **7249250184/185**



**उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक**
आपकी उम्मीद का खाता
(शेड्युल्ड कमर्शियल बँक)

झोनल कार्यालयः रुपा सफायर, 21वा मजला, प्लॉट क्र. 12, सेक्टर 18, सानपाडा रेल्वे स्टेशन समोर, वाशी, नवी मुंबई - 400 705.
नोंदणीकृत कार्यालयः उत्कर्ष टॉवर, एनएच इ 31 (एअरपोर्ट रोड), सेहमलपूर, काझी सराई, हरहुआ, वाराणसी, उप्र-221 105.

**अचल मालमत्तेसाठी ताबा सूचना**

याद्वारे सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 च्या नियम 3 सह वाचण्यात येणारया अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत प्राधिकृत अधिकारयांनी खाली नमूद प्रत्येक खात्यासमोर नमूद दिनांकांना मागणी सूचना पाठवल्या ज्यांत त्यांना सदर सूचनेच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत सदर रकमेचा भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. कर्जदार सदर रकमेचा भरणा करण्यात असमर्थ ठरल्याने याद्वारे खाली नमूद कर्जदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सदर नियमांमधील नियम 8 सह वाचण्यात येणारया सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत प्रत्येक खात्यासमोर नमूद दिनांकास खाली नमूद करण्यात आलेल्या मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे.

संबंधित कर्जदार आणि सर्व लोकांना याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी खाली नमूद मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मालमत्तेच्या संदर्भात असा कोणताही व्यवहार केल्यास तो **उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड** च्या खाली प्रत्येक खात्यासमोर नमूद रक्कम अधिक तीवरील व्याज एवढ्या रकमेच्या भाराधीन असेल.

सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (8) कडे वेधण्यात येते.

| अ. क्र. | शाखेचे नाव | खात्याचे नाव | कर्जदार / जामीनदाराचे नाव (मालमत्तेचे मालक) | मागणी सूचना दिनांक | ताबा सूचना दिनांक | मागणी सूचना दिनांक रोजी थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पुणे | 1547060000006146 | श्री. हसमुख पारसमल जैन (कर्जदार/गहाणकार) श्रीमती आशा हसमुख जैन (सह-कर्जदार) श्री. धिरज पारसमल जैन (जामीनदार) | 30/01/2024 | 15/04/2024 | रु. 50,97,821.58/- |
| **मालमत्तांचे वर्णनः** मालमत्ता दुकान क्र. 6, तळ मजला,. पूर्वेस- अंतर्गत रस्ता, पश्चिमेस- पुणे सिंहगड रोड, उत्तरेस- दुकान क्र. 5, दक्षिणेस- दुकान क्र. 7. | | | | | | |
| 2 | पुणे | 1547060000006240 | श्री. हसमुख पारसमल जैन (कर्जदार) श्रीमती मंजुळा पारसमल जैन (सह-कर्जदार/गहाणकार) | 30/01/2024 | 15/04/2024 | रु. 47,15,588.77/- |
| **मालमत्तांचे वर्णनः** मालमत्ता सदनिका क्र. 1, पहिला मजला, कुडाळे पाटील प्रेस्टीज, आनंद नगर, सिंहगड रोड, सर्वे क्र. 34/2/2, वडगाव बु., पुणे, जिल्हा पुणे, 411051. पूर्वेस- बिल्डिंग क्र. डी, पश्चिमेस- सदनिका क्र. 2, उत्तरेस- जिना, दक्षिणेस-रस्ता. | | | | | | |
| 3 | पुणे | 1547050000006120 | श्री. प्रथमेष संजय भिलारे (कर्जदार/गहाणकार) श्री. संजय ज्ञानोबा भिलारे (सह-कर्जदार) | 01/02/2024 | 15/04/2024 | रु. 45,80,937/- |
| **मालमत्तांचे वर्णनः** सदनिका क्र. 501, पाचवा मजला, विंग/बिल्डिंग ए, यासह एक खुली/कव्हर्ड कार पार्किंगची जागा क्र. 32 वापरण्याचा अनन्य अधिकार, क्षेत्रफळ सुमारे 100 चौ.फू. म्हणजे 9.29 चौ.मी., तळ मजला, श्री स्वामी समर्थ कॉम्प्लेक्स या इमारतीत, जमिनीचे क्षेत्रफळ सुमारे 2230 चौ.मीटर यावर बांधलेली, जमीन सर्वे क्र. 21/3ए, एचडीएफसी बँकेच्या जवळ, खराडी-हडपसर बायपास रस्ता, मौजे खराडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे, महा. - 411014. पूर्वेस- मोकळी जागा, पश्चिमेस- प्रवेश, उत्तरेस- मोकळी जागा/लगतची इमारत, दक्षिणेस- जिना. | | | | | | |
| 4 | पुणे | 1379060000006154 आणि 1379060000006225 | श्री. प्रवीण नामदेवराव भुयारकर (कर्जदार/गहाणकार) श्रीमती अरुणा प्रवीण भुयारकर (सह-कर्जदार/गहाणकार) | 02/02/2024 | 18/04/2024 | रु. 1,18,20,759.97/- |
| **मालमत्तांचे वर्णनः** कर्ज खाते क्र. 13790600000061 54. अनामतीचे परिशिष्ट (क) मालमत्ता प्लॉट क्र. 14, ख.क्र. 213, प.ह.क्र. 46, मौजा वानाडोंगरी, नगर परिषद वानाडोंगरी, डी मार्टच्या मागे, हिंगणा रोड, तह. हिंगणा, जिल्हा नागपूर, 440016. पूर्वेस- प्लॉट क्र. 24 आणि 25, पश्चिमेस- रस्ता, उत्तरेस- प्लॉट क्र. 13, दक्षिणेस- प्लॉट क्र. 15, आणि कर्ज खाते क्र. 1547060000006240 **अनामतीचे परिशिष्ट (II):** मालमत्ता सदनिका क्र. ए3/105, बिल्डिंग क्र. 3, पहिला मजला, रचना आनंदवन, एनपी मालमत्ता क्र. 13855, मौजा वानाडोंगरी, प.ह.क्र. 46, ख.क्र. 392/1, प्रभाग क्र. 8, सरकारी आयटीआय जवळ, महाजनवाडी, वानाडोंगरी, तहसील हिंगणा, जिल्हा नागपूर. पूर्वेस- सदनिका क्र. ए3/104, पश्चिमेस- मोकळी जामीन, उत्तरेस- सदनिका क्र. ए3/106, दक्षिणेस- कंपाऊंड भिंत आणि रस्ता. | | | | | | |

**दिनांकः 20/04/2024**
**ठिकाणः महाराष्ट्र**

स्वा/-
(प्राधिकृत अधिकारी)
उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लि.



OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.

**ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**
**कॉर्पोरेट कार्यालयः कोहिनूर स्क्वेअर, सत्तेचाळीसावा मजला, एन.सी.केळकर मार्ग, आर.जी.गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई-400028. मोबा. क्र.- 9773406175**

**अचल मत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

**[नियम 9(1) सह नियम 8(6) ची तरतूद पाहावी]**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे कर्जदार **दिवंगत विद्याप्रकाश शिवदुलारे तिवारी (कर्जदार), उमा विद्या प्रकाश तिवारी (सह-कर्जदार आणि कायदेशीर वारस) आणि अंकित कुमार व्ही. तिवारी (सह-कर्जदार आणि कायदेशीर वारस) आणि अक्षत विद्या प्रकाश तिवारी (सह-कर्जदार आणि कायदेशीर वारस)** आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण/भारग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या मालमत्तेचा सुरक्षित धनको ओमकारा एआरसी च्या प्राधिकृत अधिकारयांनी ताबा घेतला असून तिची ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'', आणि ''तेथे जे काही आहे'' आणि कोणताही उपाय नाही या तत्वावर 09/05/2024 रोजी सका. 11.00 ते दु. 2.00 वाजेपर्यंत (बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक आणि वेळ 08/05/2024 रोजी सायं 6.00 वाजेपर्यंत) सुरक्षित धनको मे. ओमकारा असेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांना वरील कर्जदार आणि सह-कर्जदार यांचेकडून **30.11.2019** रोजी नुसार **रु. 2,18,41,619.09/- (रुपये दोन कोटी अठरा लक्ष एक्केचाळीस हजार सहाशे एकोणवीस आणि नऊ पैसे फक्त)** अधिक पुढील व्याज, खर्च, अधिभार, शुल्के यांच्यासह कंत्राटी दराने जमा झालेले व्याज/वसुली न केलेल्या व्याजसह आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इत्या. इतक्या रमकेच्या वसुलीसाठी विक्री केली जाईल.

(ओमकारा पीएस 04/2020-21 ट्रस्ट चे ट्रस्टी म्हणून काम पाहणारे) दिओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांनी दि. 15.06.2020 रोजीच्या अभिहस्तांकन करारान्वये वर नमूद कर्जदार/जामीनदार यांची संपूर्ण थकबाकी कर्जे दि ईसीएल फायनान्स लि. यांचेकडून अंतर्निहित अनामतींसह अधिग्रहित केली आहे.

अचल मालमत्तांचे वर्णन,आरक्षित किंमत, बयाणा रक्कम, व ज्ञात बोजे इ. खालीलप्रमाणे आहेतः

**मालमत्तेचे वर्णन**-जमीन प्लॉट क्र. 2-सी, क्षेत्रफळ सुमारे 2178.46 चौ.फू. (202.38 चौ.मी.), (प्लॉट क्र. 2 चा भाग, क्षेत्रफळ सुमारे 14,370 चौ.फू.) यासह वर्तमान व भविष्यातील उपलब्ध एफएसआय आणि वाहिवाटीचे इतर सर्व अधिकार, घर क्र. 195/2/सी, कोर. वॉर्ड क्र. 61 च्या हद्दीत, सिटी सर्वे क्र. 2444, शीट क्र. 67/63, मौजा जरीपटका, विभाग क्र. 8, सर्कल क्र. 25, शेख कॉलनी, टाकळी फीडर रोड, नागपूर. नामपा आणि नासूप्र हद्दीत, तह. आणि जिल्हा नागपूर (महाराष्ट्र)

**आरक्षित किंमतः रु. 2,35,00,000/- बयाणा रक्कमः रु. 23,50,000/-**

**ई-लिलाव दिनांकः 09/05/2024 रोजी सका. 11.00 ते दु. 2.00 वाजेपर्यंत**

**किमान बोली वृद्धी रक्कमः रु. 1,00,000/- (रुपये एक लक्ष फक्त)**

**सहभागाचे बोलीपत्र / केव्हायसी दस्तावेज / बयाणा रकमेचा पुरावा जमा करण्यासाठी शेवटचा दिनांक आणि वेळः 08/05/2024 रोजी सायं 6.00 वाजेपर्यंत**

**पाहणीचा दिनांक व वेळः04/05/2024 रोजी दु. 1.00 ते सायं 4.00 वाजेपर्यंत**

**ज्ञात दायित्वेः ज्ञात नाही**

हे प्रकाशन सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोरसमेंट) रूल्स, 2002 मधील नियम 9(1) सह वाचण्यात येणारया नियम 8(6) अंतर्गत कर्जदार/सह-कर्जदार यांना बजावण्यात येणारी पंधरा दिवसांची सूचनादेखील आहे.

**विक्रीच्या तपशीलवार नियम व अटींसाठी कृपया सुरक्षित धनको यांनी दिलेल्या वेबसाईटवरील लिंक पाहा म्हणजे ttp://omkaraarc.com/auction.phpआणि प्राधिकृत अधिकारी प्रतीक्षा पटेल (संपर्क क्र. 9773406175 आणि राजेंद्र देवर्डे -9324546651 आणि ईमेल- Pratiksha.patel@omkaraarc.com येथे संपर्क करा) बोलीदार पुढील वेबसाईटलाही भेट देऊ शकता http://www.bankauction.com किंवा सेवा पुरवठादार मे. सी1 इंडिया प्रा. लि. यांचेशी संपर्क करू शकता, टेलि हेल्पलाईनः +91-7291981124/25/26, हेल्पलाइन ईमेल आयडीः support@bankeauctions.com, श्री. भाविक पंड्या, मोबाइल- 88666 82937 ईमेल- maharashtra@c1india.com इच्छुक बोलीदारांना नादारी व दिवाळखोरी संहिता 2016 मधील अनुच्छेद 29ए अंतर्गत घोषणापत्र देऊन व त्याचे पालन करावे लागेल.**

**दिनांकः 20.04.2024**
**स्थानः नागपूर**

स्वा/-
प्राधिकृत अधिकारी,
ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.
(ओमकारा पीएस 04/2020-21 ट्रस्ट चे विश्वस्त म्हणून काम पाहणारे)


हे पत्र **मुद्रक आणि प्रकाशक विरेंद्र विद्याधर रानडे** यांनी मालक, दि इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - दि इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी लोकमत, प्लॉट नं. १९२, २०७ आणि २०८, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपूर-४४११०८ येथे छापून प्लॉट. नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, अंबाझरी ले-आऊट, अंबाझरी, नागपूर-४४००१० येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी क्रमांक : २२३०४२१, २२३६८९७, फॅक्स क्रमांक : २२३६९८६. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी क्रमांक : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००, फॅक्स : ०२०६७२४११४७. **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** **संपादक : गिरीश कुबेर** **निवासी संपादक : देवेंद्र गावंडे*** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Loksatta, RNI. No. 54743/92, Dated 30-4-92.

© दि. इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.